**संक्षीप्त फौजदारी खटला क्रमांक २७८/२०२४ मधील निशाणी क्रमांक १९ वरील आदेश.**

**CNR NO.MHSN070005392024**

**महाराष्ट्र सरकार वि. रमेश जाधव वगैरे**

सदरचा अर्ज आरोपी क्र. १ रमेश संभाजी जाधव याने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४९७ अन्वये संक्षीप्त फौजदारी खटला क्र.२७८/२०२४ ( गु.र.क्र. २३४/२०२४) मध्ये पोलीसांनी जप्त केलेली मोटारसायकल वाहन क्र.एमएच १० डीएच ८८०० चा अंतरिम ताबा मिळण्याकरता दाखल केलेला आहे. सदर अर्जाचे पृष्ठ्यर्थ अर्जदारांनी त्यांचे शपथपत्र दाखल केले आहे.

०२. अर्जदाराच्या कथनानुसार सदरची मोटारसायकल त्याच्या मालकीची आहे. सदर वाहन त्यास दैननंदिन वापरासाठी आवश्यक आहे. सदरचे वाहन पोलीस ठाण्यात पडून राहिल्यास ते खराब होवून त्याचे नुकसान होणार आहे. सदर खटला गुणदोषावर चालुन त्याचा निकाल लागण्यास बराच कालावधी लागणार आहे. अशा स्थितीत सदरचे वाहन विना वापर पोलीस ठाण्यात राहिले तर अर्जदाराचे आर्थीक नुकसान होणार आहे. अर्जदार हे न्यायालय सांगेल त्या अटींची पुर्तता करण्यास तयार आहेत. करीता मोटारसायकल वाहन क्र.एमएच १० डीएच ८८०० चा अंतरिम ताबा अर्जदारास मिळावा, अशी विनंती अर्जदारांनी केलेली आहे.

०३. प्रस्तुतच्या गुन्हयामध्ये या न्यायालयामध्ये दोषारोपपत्र दाखल होवून त्यास संक्षीप्त फौजदारी खटला क्रमांक २७८/२०२४ असा क्रमांक पडलेला आहे. सदर मुददेमालाचा अर्जदाराव्यतिरिक्त आजपर्यंत कोणीही ताबा मागितलेला नाही. सहा. सरकारी अभियोक्ता यांनी त्यांचे म्हणणे दाखल करुन सदर मोटारसायकलाचा वापर आरोपीने गंभीर गुन्हयामध्ये केलेला आहे. सदरची मोटारसायकल परत दिल्यास ती मोटारसायकल आरोपी पुन्हा इतर गुन्हयामध्ये वापर करण्याची शक्यता आहे.

सदरच्या वाहनामध्ये भौतीक बदल करण्याची शक्यता आहे. या सर्व गोष्टींचा विचार करुन प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी विनंती त्यांनी केली आहे.

०४. प्रस्तुत खटल्यात आरोपी क्र. २ गौस मुबारक मुलाणी यांचे म्हणणे मागविण्यात आले. आरोपी क्र. २ ने त्याचे म्हणणे सादर न केल्यामुळे सदरचा अर्ज आरोपी क्र. २ च्या म्हणण्याविना निकाली करण्यात आला.

०५. अर्ज, म्हणणे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. दोन्हीही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. अर्जदारने जप्त वाहन त्याच्या मालकीचे असल्याबाबत त्या वाहनाचे नोंदणी प्रमाणपत्राची सत्यांकित प्रत फेरिस्त नि.क्र.२२/१ ला दाखल केलेली आहे. अर्जदारने दाखल केलेल्या कागदपत्रांवरुन अर्जदार हे जप्त वाहनाचे नोंदणीकृत मालक असल्याचे दिसुन येते. सदयस्थीतीमध्ये अर्जदाराव्यतिरिक्त कोणीही सदर वाहनाचा अंतिम ताबा मिळण्यास पात्र असल्याचे दिसून येत नाही. सदर वाहन कवठेमहांकाळ पोलीस ठाणे येथे पडुन राहिल्यास ते खराब होण्याची शक्यता आहे. तसेच अर्जदाराव्यतिरिक्त इतर कोणीही सदरच्या वाहनाचा ताबा मागितलेला नाही. करिता सदर वाहनाचा अंतरिम ताबा अर्जदारास देणे योग्य ठरते. सबब जप्त वाहनाचा अंतरिम ताबा देतांना अर्जदार यांच्यावर अर्टी व शर्ती लादणे न्याय्य होणार आहे. वरील सर्व कारणांवरुन, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे-

## आदेश

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. पोलीस निरीक्षक, कवठेमहांकाळ पोलीस ठाणे यांनी मोटारसायकल वाहन क्र.एमएच १० डीएच ८८०० चा अंतरिम ताबा अर्जदार आरोपी क्र. १ रमेश संभाजी जाधव राहणार बोरगांव, ता.कवठेमहांकाळ, जि.सांगली यांना रक्कम रुपये २,००,०००/- (दोन लाख रुपये) चा सुपुर्तनामा (Indemnity Bond) लिहुन दिल्यावर

व त्याची योग्य ओळख पटवुन दिल्यानंतर, खालील अटींवर देण्यात यावा-

**अ.** अर्जदारने सदर गुन्ह्याचा अंतिम निकाल होईपावेतो सदरचा मुद्देमाल कोणत्याही मार्गे हस्तांतर करु नये अगर त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल करु नये.

**ब.** अर्जदारने न्यायालय हुकुम करेल त्यावेळी सदरचा मुद्देमाल न्यायालयात हजर करणेचा आहे.

**क.** पोलीस निरीक्षक कवठेमहांकाळ पोलीस ठाणे यांनी अर्जदारच्या खर्चावर सदर वाहनचे छायाचित्र काढुन त्याचा पंचनामा करावा. सदर छायाचित्र, पंचनामा व सदर हानिरक्षण बंधपत्र प्रस्तुत खटल्यात दाखल करावे.

ARUN RAGHUNATH VYAWAHARE

Digitally signed by ARUN RAGHUNATH VYAWAHARE
Date: 2025.01.04 07:12:31 +0530

दिनांक ०३.०१.२०२५

( अरुण र. व्यवहारे )
न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग

कवठेमहांकाळ.

कवठेमहांकाळ.

Certificate

I affirm that the contents of this P.D.F. file order is same, word to word, as per the original order.

Name of the Stenographer - H.P.Haridas
Court - CJJD and JMFC, Kavathemahankal.
Date - 03.1.2025
Order signed by the
Presiding Officer on -03.1.2025
Order uploaded on -04.1.2025